महाराष्ट्र भूमि अभिलेख
LAND RECORDS MAHARASHTRA
स्वामित्वरक्षणम् भुलेखजतनम्

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# जमाबंदी आयुक्त आणि संचालक

# भूमि अभिलेख

## सुधारित आकृतिबंध

# विभागाची रचना

**जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख (म.राज्य), पुणे.**

**अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भुमि अभिलेख, पुणे**


- उपसंचालक भुमि अभिलेख संलग्न ज.आ. (भूमापन) पुणे
- उपसंचालक भुमि अभिलेख संलग्न ज.आ. (ना.भूमापन) पुणे
- उपसंचालक भुमि अभिलेख संलग्न ज.आ. (एकत्रिकरण) पुणे
- अप्पर जिल्हाधिकारी तथा राज्य समन्वयक ई-फेरफार
  - एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष
  - महसूल माहिती तंत्रज्ञान कक्ष

- उपसंचालक भूमि अभिलेख पुणे प्रदेश, पुणे
- उपसंचालक भूमि अभिलेख कोकण प्रदेश, मुंबई
- उपसंचालक भूमि अभिलेख नाशिक प्रदेश, नाशिक
- उपसंचालक भूमि अभिलेख अमरावती प्रदेश, अमरावती
- उपसंचालक भूमि अभिलेख छ.संभाजीनगर प्रदेश,संभाजीनगर
- उपसंचालक भूमि अभिलेख नागपूर प्रदेश, नागपूर

विभागानिहाय अंतर्गत सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख

जिल्हा निहाय अंतर्गत सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी / विशेष उप अ. भू.अ. तथा चौ.अ. गावठाण कार्यालये

# भूमि अभिलेख विभागातील महत्वाचे शासकीय निर्णय




- **त्यानुसार आज रोजी भूमि अभिलेख विभागाची एकूण** 9689 **पदांची आस्थापना अस्तित्वात**
- तालुकास्तरीय कार्यालयाची निर्मिती सन 1994 व सुधारीत आकृतीबंध मंजूर सन 2003 नंतर राज्यातील वाढते नागरीकीकरण, राज्याची औद्योगिक प्रगती, शेतजमिनीचे वाढलेले भाव, इत्यादी कारणांमुळे तुलनेने कामामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ
- विभागातील कामाचे प्रमाण, उपलब्ध तंत्रज्ञान इत्यादी बाबी विचारात घेता विभागाचा सुधारीत आकृतीबंध प्रस्तावित.

# भूमि अभिलेख विभाग

## भूमी अभिलेख विभागाची कार्ये

### जमीन मोजणी
- हद्दकायम, पोटहिस्सा, बिनशेती, कोर्ट कमिशन, कोर्ट वाटप, शासकीय प्रकल्पांसाठी भूसंपादन

### अभिलेख अद्ययावतीकरण
- जमिनीशी संबंधित अभिलेखांचे अद्ययावती करण

### कायद्याशी संबंधित नोंदी
- नगर भूमापन झालेल्या मिळकतींसाठी खरेदी, वारस, हक्कसोड, गहाणखत इत्यादी कायदेशीर नोंदी

### अभिलेख निर्मिती
- जमीन मोजणी आणि जमिनीशी संबंधित अभिलेखांची निर्मिती

### अभिलेख जतन
- जमिनीशी संबंधित अभिलेखांचे जतन

# भूमि अभिलेख विभागाचे कामकाज

**जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख (म.राज्य), पुणे.**

- भूमापन
- नागरी भूमापन
- ई-फेरफार कक्ष
- एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष

# भूमापन

**भूमापन मोजणी**

- मागील 3 वर्षात सरासरी आवक 3,25,000 मोजणी प्रकरणे व निर्गती 2,40,000 मोजणी प्रकरणे त्यामधून र.रु. 3.60 कोटी महसूल जमा
- शहरीकरण, शासकीय भूसंपादन प्रस्ताव, खरेदीपूर्व मोजणी, शेत/पाणंद रस्ते मोजणी यामुळे मोजणी प्रकरणात 15% वाढ होणे अपेक्षित
- दरवर्षी महसूल वाढ 15% अपेक्षित

**आगामी प्रकल्प**

- पोट हिस्सा मोजणी – 2.12 कोटी
- खरेदी पूर्व मोजणी – 2.10 लाख (शेती मिळकतीकडील)
- मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना – 1.45 लाख
- Building Planning Management System (BPMS) – दरवर्षी 1.50 लाख

| अ.क्र. | सन | मोजणी आवक | महसूल वसुली (आकडे कोटीत) |
|---|---|---|---|
| 1 | 2026-27 | 305412 | 465 |
| 2 | 2027-28 | 335953 | 511 |
| 3 | 2028-29 | 369548 | 562 |
| 4 | 2029-30 | 406503 | 619 |
| 5 | 2030-31 | 447153 | 681 |

# नागरी भूमापन

## ग्रामिण क्षेत्र - स्वामित्व योजना

- मागील ५ वर्षामध्ये पूर्ण झालेली गावे- २७,७९७ (७७.३०%)
- तयार मिळकत पत्रिका - ७३,८०,६६९
- भविष्यात होणारी गावे-८,१६१
- नव्याने मिळकत पत्रिका - १३,१३,२२२

विस्तारीत गावठाण
- एकूण गावे- ३५,९५८
- नव्याने मिळकत पत्रिका - ५३,९५,२००

एकूण - १.४१ कोटी अंदाजे मिळकत पत्रिका तयार होतील

- अपेक्षित महसूल अंदाजे १६७ कोटी

## शहरी क्षेत्र - NAKSHA कार्यक्रम

- जून २०२५ पासून १० शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये अंदाजे NAKSHA कार्यक्रमांतर्गत १,५०,००० मिळकत पत्रिका मार्च २०२५ अखेर तयार होणार आहेत.
- एकूण शहरी स्थानिक स्वराज्य संस्था -४२५ असून एकूण नव्याने - १.२५ कोटी मिळकत पत्रिका NAKSHA अंतर्गत तयार होतील.
- अपेक्षित महसूल अंदाजे ३१२.५ कोटी

## बहुमजली सदनिका अधिकार अभिलेख

- मा. अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे.
- एकूण शहरी स्थानिक स्वराज्य संस्था -४२५ असून एकूण २.२५ कोटी नव्याने - मिळकत पत्रिका तयार होतील
- अपेक्षित महसूल अंदाजे ५६२.५ कोटी

## मिळकत पत्रिका फेरफार

- आजपर्यंत उपलब्ध मिळकत पत्रिका - ९९.७८ लाख
- दरवर्षी होणारे फेरफार - अंदाजे ४.२ लाख
- भविष्यात नव्याने मिळकत पत्रिका-४ कोटी
- दरवर्षी अपेक्षित फेरफार - अंदाजे १६.८ लाख

# ई-फेरफार कक्ष

**ई-फेरफार**
फेरफार नोंदणी व मंजुरीची संपूर्ण संगणकीकृत प्रक्रिया.

**आय-सरिता + ई-फेरफार**
दस्त नोंदणीनंतर फेरफार आपोआप कार्यान्वित होणे.

**ई-हक्क**
नागरिकांकडून ऑनलाईन फेरफार अर्ज स्वीकारणे व ट्रॅकिंग सुविधा.

**ULPIN – PUID**
प्रत्येक भूखंडास अद्वितीय ओळख क्रमांक प्रदान करणे.

**AgriStack**
शेतकरी माहितीचे एकत्रित व प्रमाणित डिजिटल नोंदवही.

**डिजिटल 7/12**
अधिकार अभिलेख पाहणे व डाउनलोड करण्याची सुविधा.

**MIS डॅशबोर्ड**
महसूल संगणकीकरण प्रकल्पांचा आढावा व प्रगती निरीक्षण.

**महाभूमी पोर्टल**
भू-अभिलेख व महसूल सेवा एकत्रित डिजिटल व्यासपीठ.

---

- ई-फेरफार
- ई-चावडी
- ई-पिक पाहणी
- AgriStack

---

**LGD कोड**
प्रशासनिक घटकांचे प्रमाणित कोड एकत्रीकरण.

**BPMS – NA**
बिगर शेती (Non-Agricultural) परवानगीसाठी ऑनलाईन प्रक्रिया.

**SARFAESI प्रकरणे**
बँक व वित्तीय संस्थांशी संबंधित तारण जमीन प्रकरणांचे व्यवस्थापन.

**तक्रार निवारण पोर्टल्स**
नागरिकांच्या तक्रारींची ऑनलाईन नोंद व निवारण व्यवस्था.

**माझी जमीन माझा हक्क**
नागरिकांना त्यांच्या जमिनीवरील हक्कांची पारदर्शक माहिती उपलब्ध करून देणारा उपक्रम.

**डिजिटल पीक सर्वेक्षण**
तंत्रज्ञानाधारित पिक क्षेत्र व पिक प्रकार सर्वेक्षण.

**अधिकार अभिलेखात आधार संलग्नता**
7/12 व अधिकार अभिलेखांमध्ये आधार क्रमांक जोडणी.

**भूमित्रा चॅटबॉट**
भू-अभिलेख व महसूल सेवांबाबत नागरिकांसाठी संवादात्मक सहाय्य.

**लँड डॅशबोर्ड**
जमिनीशी संबंधित विविध डेटाचा एकत्रित आढावा.

# ई-फेरफार कक्ष

## सध्या कार्यरत पदे

| | |
|---|---|
| अपर जिल्हाधिकारी | ०१ पद |
| नायब तहसीलदार | ०१ (सेवा वर्ग) |
| मंडळअधिकारी | ०3 (सेवा वर्ग) |
| ग्राम महसूल अधिकारी | 1१ (सेवा वर्ग) |
| महसूल सहाय्यक | ०१ (सेवा वर्ग) |

## प्रस्तावित मनुष्यबळ

| | |
|---|---|
| अपर जिल्हाधिकारी | ०१ पद |
| उपजिल्हाधिकारी | 0२ पद |
| तहसीलदार | 0२ पद |
| उप अधीक्षक भूमी अभिलेख | ०१ पद |
| नायब तहसीलदार | ०4 पद |
| अव्वल कारकून /मंडळअधिकारी | ०4 पद |
| ग्राम महसूल अधिकारी | ०6 पद |
| महसूल सहाय्यक | ०4 पद |

# एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (UPMU)

**उद्देश:**

- महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग व नोंदणी व मुद्रांक विभागातील संगणकीकरण व डिजिटायझेशन प्रकल्प राबवणे.

UPMU **चे प्रमुख कार्य** :

- विविध IT प्रकल्पांचे केंद्रीत परीक्षण व देखरेख
- विभागीय व विक्रेता समन्वय
- प्रणाली एकत्रीकरण व राज्यव्यापी अंमलबजावणी
- पारदर्शक, कार्यक्षम व नागरिक-केंद्रित सेवा वितरणास सहाय्य

## प्रकल्प


- जमीन माहितीपीठ
- eQJCourts 2.0 (e-Sunavani एकत्रीकरणासह)
- SARFAESI प्रणाली
- ई-नझूल (वर्ग-2 जमिनींचे वर्ग-1 मध्ये रूपांतरण):
- भूमी संपादन व नागरिक-केंद्रित सेवा प्रकल्प
- सेवदूत प्रणाली (अभिप्राय कक्षासह)
- महासंपर्क प्रकल्प (चॅटबॉट व 12×7 कॉल सेंटर)

## मनुष्यबळाची प्रस्तावित रचना

| प्रस्तावित पदे | पदांची संख्या |
|---|---|
| अपर जिल्हाधिकारी | १ |
| उप जिल्हाधिकारी | १ |
| जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख | १ |
| सह दुय्यम निबंधक वर्ग -२ | १ |
| उप अधीक्षक, भूमी अभिलेख | १ |
| लेखाधिकारी | १ |
| अव्वल कारकुन/वरिष्ठ लिपिक/शिरस्तेदार | २ |
| कनिष्ठ लिपिक/महसूल सहाय्यक/सर्व्हेअर | २ |

# विभागाची आर्थिक उद्दिष्टे

| वर्ष | महसूली जमा | स्वीय प्रपंजी लेखे | केंद्रीय योजना प्रोत्साहन निधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| 2023-24 | 390.32 | 92.43 | - | 482.75 |
| 2024-25 | 422.35 | 126.91 | 154 | 930.26 |
| 2025-26 (डिसेंबर अखेर) | 381.08 | 92.10 | 381 | 1173.18 |




## आगामी प्रकल्प

- पोट हिस्सा मोजणी : 2.12 कोटी मोजणी प्रकरणे
- खरेदी पूर्व मोजणी : 3.12 लाख (शेती मिळकतीकडील) मोजणी प्रकरणे
- मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना : 1.45 लाख मोजणी प्रकरणे
- Building Planning Management System (BPMS) : दरवर्षी 1.50 लाख
- दरवर्षी महसूल उत्पन्नात 25 % वाढ.

## नागरी भूमापन

- स्वामित्व योजना- 167 कोटी (सनद फी)
- नक्क्षा कार्यक्रम- 312 कोटी
- बहुमजली सदनिका अधिकार अभिलेख-562 कोटी
- याव्यतिरिक्त मिळकत पत्रिका नक्कल शुल्क, नकाशे नक्कल शुल्क या माध्यमातून कायमस्वरुपी शासनास उत्पन्न प्राप्त होत राहील.

# प्रशासकीय सुधारणा

| E office **प्रणाली** | **मोजणी** V-2 | PCIS / **फेरफार** | E record | **नवीन स्वामित्व व नक्षा प्रकल्प** |
|---|---|---|---|---|
| • क्षेत्रीय स्तरा पर्यन्त 100 % कार्यालयामध्ये वापर<br>• BPR करून प्रत्येक नस्तीसाठी मंजुरीचे स्तर तीन पर्यन्त मर्यादित केले<br>• वर्षभरात विभागात १,२०,००० ऑनलाईन नसती तयार करून कार्यवाही<br>• ९३% नस्तींची विहित मुदतीत कार्यवाही पूर्ण | • पूर्ण मोजणी प्रक्रिया संगणीकृत<br>• आवश्यक संदर्भ अभिलेख कर्मचाऱ्यांना उपलब्ध केले<br>• सर्वेनंतर नकाशा मंजुरीचे स्तर कमी केले<br>• मोजणी नकाशा ऑनलाइन<br>• सर्व कर्मचाऱ्यांना रोव्हर्स व लॅपटॉप उपलब्ध केले<br>• नोटिस प्रक्रिया ई पोस्ट द्वारे स्वयंचलित केली | • ऑनलाइन कालावधी ३५ दिवसंपर्यंत कमी केला<br>• नोटिस प्रक्रिया ई पोस्ट द्वारे स्वयंचलित केली<br>• संपूर्ण फेरफार प्रक्रिया ऑनलाईन | • नागरिकांना नकाशा व इतर अभिलेख ऑनलाइन उपलब्ध केले | • ड्रोन द्वारे सर्वे<br>• नवीन नोटिस व चौकशी प्रक्रिया ऑनलाइन<br>• पारदर्शक व कार्यक्षम प्रक्रिया |

# भूमि अभिलेख विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवांची माहिती (Benchmarks)

| सेवा | प्राप्त अर्ज | निकाली अर्ज | निश्चित केलेले मानक (Benchmark) | सेवा पुरविणेस लागलेला कालावधी |
|---|---|---|---|---|
| 7/12 **डाऊनलोड** | 11,99,26,183 | 11,99,26,183 | 2 **मिनिटे** | 5 **मिनिटे** |
| **मिळकत पत्रिका डाऊनलोड** | 67,64,257 | 67,64,257 | 2 **मिनिटे** | 5 **मिनिटे** |
| **ई रेकॉर्ड** | 2,25,648 | 2,25,648 | 2 **मिनिटे** | 5 **मिनिटे** |
| ePCIS **फेरफार अर्ज** (2025-26) | 2,81,276 | 2,58,001 | 25 **दिवस** | 35 **दिवस** |
| **मोजणी अर्ज** (2025-26) | 2,54,340 | 1,75,669 | 90 **दिवस** | 127 **दिवस** |

# विभागातील रिक्त पदांची माहिती

| पदाचे नाव | मंजूर | कार्यरत | रिक्त | शेरा |
|---|---|---|---|---|
| उपसंचालक भूमि अभिलेख | 9 | 7 | 2 | |
| राज्य संचालक, महसुल माहिती तंत्रज्ञान कक्ष, ज.आ. पुणे. | 1 | 1 | 0 | |
| जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख | 43 | 38 | 5 | |
| लेखा अधिकारी | 1 | 0 | 1 | |
| उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी | 431 | 354 | 77 | सरळसेवा कोटयातील 23 पदे रिक्त असून त्याबाबतचे मागणी पत्र शासनास सादर पदोन्नती कोटयातील 54 पदे रिक्त आहेत व ही पदे भरणेबाबत निवडसूची 2025-2026 ची कार्यवाही प्रगतीत. |
| सहाय्यक लेखाधिकारी | 2 | 1 | 1 | |
| उच्चश्रेणी लघुलेखक | 2 | 0 | 2 | |
| निम्नश्रेणी लघुलेखक | 9 | 4 | 5 | |
| शिरस्तेदार | 806 | 749 | 57 | |
| परिरक्षण भूमापक/निमतानदार | 1392 | 1343 | 49 | |
| भूकरमापक | 4299 | 3120 | 1179 | 903 पदांची भरती कार्यवाहीत व फेब्रुवारी 2026 अखेर पूर्ण होईल. |
| वाहन चालक | 48 | 14 | 34 | ही पदे बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यात आली आहेत |
| नाईक/दप्तरबंद | 392 | 264 | 128 | बाह्यस्त्रोताद्वारे ७०० पदांची भरती कार्यवाहीत |
| शिपाई | 2252 | 960 | 1292 | |
| एकूण | 9687 | 6855 | 2832 | |

## सेवार्थ प्रणाली सद्यस्थिती

| अ. क्र. | विभाग | आकृतीबंधानुसार मंजूर पदे | | | सेवार्थ प्रणालीमधील एकूण मंजूर पदे | | | सेवार्थ प्रणालीमधून डिलीट करावयाची अधिसंख्य पद संख्या | सेवार्थ प्रणालीमधून डिलीट करावयाची अधिसंख्य पद (नाव) | सेवार्थ प्रणालीमधून भरायचे पद संख्या | सेवार्थ प्रणालीमधून भरायचे पद (नाव) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थाई पदे | अस्थाई पदे | एकूण | स्थाई पदे | अस्थाई पदे | एकूण | | | | |
| 1 | भूमि अभिलेख विभाग | 7544 | 2092 | 9636 | 7536 | 2141 | 9677 | 51 | 0 | 10 | 0 |

# मूळ व प्रस्तावित आकृतीबंधानुसार पदांची माहिती


| अ. क्र. | पदनाम | मूळ आकृतीबंधानुसार मंजूर पदे | प्रस्तावित आकृतीबंधानुसार पदे | प्रस्तावित पैकी | | प्रस्तावित पदांमध्ये वाढ /घट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नियमित पदे | बाह्यस्त्रोत पदे | | |
| 1 | जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख | 1 | 1 | 1 | 0 | 0 | |
| 2 | अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख | 1 | 1 | 1 | 0 | 0 | |
| 3 | उपायुक्त आणि सह संचालक (निवडश्रेणी उपसंचालक भूमि अभिलेख) | 0 | 2 | 2 | 0 | 2 | उपसंचालक भूमिअभिलेख संवर्गातील 2 पदे (निवडश्रेणी) एस-27 संवर्गात प्रस्तावित |
| 4 | अप्पर जिल्हाधिकारी | 0 | 2 | 2 | 0 | 2 | (UPMU & IT Rev. Sections) |
| 5 | उपसंचालक भूमि अभिलेख | 9 | 9 | 9 | 0 | 0 | उपसंचालक भूमिअभिलेख संवर्गातील एस-23 ऐवजी एस-25 वेतनश्रेणीमध्ये संवर्गात प्रस्तावित |
| 6 | सहाय्यक संचालक, नगर रचना | 0 | 1 | 1 | 0 | 1 | UPMU कक्षाकरीता |
| 7 | मुख्याधिकारी श्रेणी-1 (निवडश्रेणी) | 0 | 1 | 1 | 0 | 1 | UPMU कक्षाकरीता |
| 8 | उपजिल्हाधिकारी | 1 | 3 | 3 | 0 | 2 | |
| 9 | सहाय्यक संचालक भूमि अभिलेख (जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख निवडश्रेणी) | 6 | 12 | 12 | 0 | 6 | ज.आ. कार्यालयात 4 पदे, मंत्रालयातील 1 पद, उ.सं.भू.अ. कार्यालयातील प्रत्येकी 1 पद अशी 12 पदेएस-23 वेतनश्रेणीतील प्रस्तावित (निवडश्रेणी जि.अ.भू.अ.) |
| 10 | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख | 43 | 46 | 46 | 0 | 3 | |
| ११ | सहाय्यक संचालक (लेखा) | 0 | 1 | 1 | 0 | 1 | |
| १२ | तहसिलदार | 0 | 2 | 2 | 0 | 2 | |

# मूळ व प्रस्तावित आकृतीबंधानुसार पदांची माहिती

| अ.क्र. | पदनाम | मूळ आकृतीबंधा नुसार मंजूर पदे | प्रस्तावित आकृतीबंधा नुसार पदे | प्रस्तावितपैकी | | प्रस्तावित पदांमध्ये वाढ /घट |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नियमित पदे | बाह्यस्त्रोत पदे | |
| 13 | लेखाधिकारी | 1 | 2 | 2 | 0 | 1 |
| 14 | कार्यासन अधिकारी/उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी | 431 | 515 | 515 | 0 | 84 |
| 15 | सहदुय्यम निबंधक वर्ग -2 (UPMU) | 0 | 1 | 1 | 0 | 1 |
| 16 | सहाय्यक लेखाधिकारी | 2 | 9 | 9 | 0 | 7 |
| 17 | नायब तहसिलदार | 0 | 4 | 4 | 0 | 4 |
| 18 | उच्चश्रेणी लघुलेखक | 2 | 2 | 0 | 2 | 0 |
| 19 | निम्नश्रेणी लघुलेखक | 9 | 10 | 0 | 10 | 1 |
| 20 | शिरस्तेदार संवर्ग | 806 | 1007 | 1007 | 0 | 201 |
| 21 | परिरक्षण भूमापक संवर्ग | 1392 | 2561 | 2568 | 0 | 1176 |
| 22 | भूकरमापक संवर्ग | 4299 | 4369 | 4369 | 0 | 70 |
| 23 | वाहनचालक | 48 | 66 | 0 | 66 | 18 |
| 24 | वरिष्ठ लेखापाल | 0 | 44 | 44 | 0 | 44 |
| 25 | अव्वल कारकून / मंडल अधिकारी | 0 | 4 | 4 | 0 | 4 |
| 26 | तलाठी | 0 | 6 | 6 | 0 | 6 |
| 27 | महसूल सहाय्यक | 0 | 4 | 4 | 0 | 4 |
| 28 | विधी अधिकारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | 0 | 8 | 0 | 8 | 8 |
| 29 | नाईक / दप्तरबंद संवर्ग | 392 | 335 | 335 | 0 | -57 |
| 30 | शिपाई संवर्ग | 2252 | 1649 | 690 | 959 | -603 |
| | एकूण | 9689 | 10684 | 9639 | 1045 | 995 |

# प्रस्तावित कार्यालये (वाढ)


| अ.क्र. | कार्यालय | सद्यस्थितीतील कार्यालयांची संख्या | प्रस्तावित कार्यालयांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख | 1 | 0 | 1 |
| 2 | उपसंचालक भूमि अभिलेख | 6 | 1 | 7 |
| 3 | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख | 36 | 8 | 44 |
| 4 | भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी | 1 | 0 | 1 |
| 5 | उप अधीक्षक भूमि अभिलेख | 353 | 0 | 353 |
| 6 | नगर भूमापन अधिकारी कार्यालय | 30 | 23 | 53 |
| 7 | विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख (न.भू./गावठाण) | 5 | 5 | 10 |
| 8 | विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख तथा चौकशी अधिकारी | 12 | 12 | 24 |
| | एकूण कार्यालये | 444 | 49 | 493 |



# सुधारीत आकृतिबंधाचा एकत्रित गोषवारा

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | सद्यस्थितीत कार्यालयांची संख्या | प्रस्तावित कार्यालयांची संख्या | सद्यस्थितीत एका कार्यालयातील पदांची संख्या | प्रस्तावित एका कार्यालयातील पदांची संख्या | प्रस्तावित पदांमध्ये वाढ /घट (एका कार्यालयाच्या) | प्रस्तावित सर्व कार्यालयातील एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे | 1 | 1 | 140 | 169 | +29 | 169 |
| 2 | उपसंचालक कार्यालये | 6 | 7 | 28 | 31 | +3 | 217 |
| 3 | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख | 35 | 43 | 13 | 20 | +7 | 860 |
| 4 | प्रशिक्षण प्रबोधिनी भूमि अभिलेख छ. संभाजीनगर | 1 | 1 | 26 | 31 | +6 | 31 |
| 5 | उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालये | 353 | 353 | 21 | 20 | -1 | 7060 |
| 6 | नगर भूमापम अधिकारी कार्यालये | 30 | 53 | 23 | 17 | -6 | 901 |
| 7 | विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख (न.भू./गावठाण) | 5 | 10 | 22 | 22 | 0 | 220 |
| 8 | विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख तथा चौकशी अधिकारी | 12 | 24 | 6 | 6 | 0 | 144 |
| 9 | **एकूण** | 444 | 492 | 279 | 316 | — | — |

# प्रस्तावित पदांमध्ये वाढ / घट




| पदनाम | मूळ आकृतीबंधा नुसार मंजूर पदे | प्रस्तावित आकृतीबंधा नुसार पदे | प्रस्तावित पदांमध्ये वाढ / घट |
|---|---|---|---|
| उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी | 431 | 515 | 84 |
| शिरस्तेदार संवर्ग | 806 | 1007 | 201 |
| परिरक्षण भूमापक संवर्ग | 1392 | 2561 | 1176 |
| भूकरमापक संवर्ग | 4299 | 4369 | 70 |
| नाईक / दप्तरबंद संवर्ग | 392 | 335 | -57 |
| शिपाई संवर्ग | 2252 | 1649 | -603 |

# आकृतीबंधानुसार वाढणारा आर्थिक भार

| | | |
|---|---|---|
| 1 | **सध्याची मंजूर पदे** | 9689 |
| 2 | **प्रस्तावित पदे** | 10683 |
| 3 | **प्रस्तावित पैकी नियमीत पदे** | 9638 |
| 4 | **प्रस्तावित पैकी बाह्यस्त्रोताद्वारे पदे** | 1045 |
| 5 | **मंजूर पदांनुसार वार्षिक खर्च** | 644.14 **कोटी** |
| 6 | **प्रस्तावित पदांनुसार वार्षिक खर्च** | 706.64 **कोटी** |
| 7 | **प्रस्तावित पदांनुसार खर्चात होणारी वाढ** | 62.50 **कोटी** |
| 8 | **बाह्यस्त्रोताद्वारे पदांवरील अंदाजे खर्च** | 26.48 **कोटी** |

**कंत्राटी पदांसह प्रस्तावित पदांमुळे खर्चात होणारी वाढ** : 88.98 **कोटी** - (13.81 %)

# खर्चाबाबत स्पष्टीकरण

- भूमि अभिलेख विभागाच्या प्रस्तावित आकृतिबंधामध्ये प्रस्तावित १०६८३ पदे दिसून येत असली तरी त्यापैकी केवळ ९६३८ पदे नियमीत प्रस्तावित केलेली आहेत. तर १०४५ पदे कंत्राटी पद्धतीने बाह्ययंत्रणेद्वारे भरण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

01

- सुधारीत आकृतीबंधामुळे **सध्याच्या मंजूर पदांवरील वार्षिक खर्चापेक्षा साधारणपणे रुपये ६२.५० कोटी** (९.७०%) इतका वार्षिक आर्थिकभार वाढ होत आहे. तसेच प्रस्तावित कंत्राटी पदांकरीताचा दरसाल अंदाजे रक्कम रुपये २६.५० कोटी खर्च विचारात घेता **एकूण खर्चामध्ये ८९ कोटी** (१३.८०%) **इतकी वाढ होत आहे**.

02

- **सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये स्वीय प्रपंजी खात्यात पुरविण्यात आलेल्या विविध सेवांमुळे १२७ कोटी** इतका निधी जमा झालेला आहे. तसेच **स्वीय प्रपंजी खात्या व्यतिरीक्त मोजणी फी, नक्कल फी, इत्यादी कारणांमुळे शासनाकडे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ४२२.३५ कोटी रुपये इतका महसूल जमा** झालेला आहे. असा **एकूण** 549.35 **कोटी** रुपये महसूल जमा झालेला आहे.

03

- **चालू आर्थिक वर्षात स्वीय प्रपंजी खात्यात साधारण २०० कोटी रुपये इतका** निधी जमा होण्याची शक्यता आहे. **स्वीय प्रपंजी खात्या व्यतिरीक्त मोजणी फी, नक्कल फी, इत्यादी कारणांमुळे शासनाकडे चालू आर्थिक वर्षामध्ये विभागास ५०० कोटी रुपये** इतके महसूल वसूलीचे इष्टांक देण्यात आलेले आहे व त्यानुसार महसूल जमा होत आहे. **असा एकूण** 700 **कोटी** रुपये महसूल जमा होणार आहे.

04

# भूमि अभिलेख विभागास
# तांत्रिक वेतनश्रेणी लागू करणेबाबत

# भूमि अभिलेख विभागास तांत्रिक वेतनश्रेणी मिळणेबाबत

भूकरमापक/कनिष्ठ लिपीक यांना तांत्रिक वेतनश्रेणी लागू करण्याबाबत वित्त विभागाला प्रस्ताव सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने सदर पद तांत्रिक दर्जाचे नसल्याने प्रस्ताव नाकारला होता.

महसूल व वन विभागाच्या दि.17/12/2011 रोजीच्या अधिसुचनेनुसार भूमि अभिलेख विभागातील गट क पदांचे सेवाप्रवेश नियम विहीत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार भूकरमापक/कनिष्ठ लिपीक संवर्गातील पदे ही माध्यमिक शालांत परिक्षेनंतर मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील सर्व्हेक्षक व्यवसाय प्रमाणपत्र (ITI Surveyor) / स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) अथवा त्यापेक्षा उच्च अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांमधून भरण्यात येतात. त्यामुळे भूकरमापक हे पद तांत्रिक स्वरूपाचे पद आहे.

भूमि अभिलेख विभागातील भूकरमापक संवर्गातील पदास सातव्या वेतन आयोगानुसार एस-6 (19900-63200) अशी वेतनश्रेणी लागू असून इतर शासकीय / निमशासकीय विभागातील (वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगरपालीका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, इत्यादी) भूमापक संवर्गातील पदांची अर्हता आणि कामकाजाचे स्वरूप भूमि अभिलेख विभागाप्रमाणेच असूनही त्या पदांना सातव्या वेतन आयोगानुसार एस-8 (25500-81100) अशी वेतनश्रेणी लागू आहे.

तसेच त्यानंतर पदोन्नतीद्वारे निमतानदार/परिक्षण भूमापक संवर्गातील 100% पदे ही भूकरमापक /कनिष्ठ लिपीक संवर्गातून पदोन्नतीने भरण्यात येतात. तसेच मुख्यालय सहाय्यक / शिरस्तेदार संवर्गातील 100% पदे निमतानदार/परिरक्षण भूमापक संवर्गातून पदोन्नतीने भरण्यात येतात. विभागातील कर्मचारी यांचेकडून मोजणी काम करताना ई. टी. एस., रोव्हर, जी. आय. एस. यासारख्या तांत्रिक साधनांचा /आज्ञावलीचा वापर करणेत येतो. त्यामुळे भूमि अभिलेख विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना तांत्रिक दर्जा देणे गरजेचे आहे.

# भूमि अभिलेख विभागास तांत्रिक वेतनश्रेणी मिळणेबाबत

वेतन त्रुटी निवारण समितीने सुधारीत वेतन श्रेणीचा प्रस्ताव नाकारल्याने भूमि अभिलेख विभागातील इतर संवर्गांबरोबर भूकरमापक / कनिष्ठ लिपिक या संवर्गाला वन विभागातील सर्व्हेअर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील सर्व्हेअर प्रमाणे एस-8 वेतनश्रेणी लागू करण्याबाबत एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव पुनश्चः वित्त विभागास सादर करण्यात आला होता

त्यास अनुसरून वित्त विभागाने दि.14.10.2025 रोजी "विभागाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पदांचे एकत्रिकरण व वेतनातील भार यामुळे मूळ आकृतिबंधात बदल संभवत असल्याने त्यानुसार मूळ आकृतीबंधात बदल करून फेरसादर करावे" असे अभिप्राय दिले आहेत

**वन विभागाकडील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्वेक्षक पदाची अर्हता, वेतनश्रेणी, पदोन्नती व कामाचे स्वरुप, इ. बाबत-**

वन विभागाच्या सर्वेक्षक पदांबाबत महसूल व वन विभागाच्या दि.30/06/2011 रोजीचे अधिसुचनेनुसार सेवाप्रवेश नियम विहीत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार ज्यांनी माध्यमिक शालांत परीक्षा पास केली आहे आणि मान्यताप्राप्त संस्थेचे सर्वेक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम प्रमाणपत्र (आय.टी.आय.) धारण केले आहे. अशा उमेदावाराची नेमणुक वन विभागातील सर्वेक्षक या पदावर करण्यात येते. वन विभागाकडील सर्वेक्षक या पदास सातव्या वेतन आयोगानुसार एस-8 (25500-81100) ही वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे.

तसेच सर्वेक्षक या पदावरुन पदोन्नतीने क्षेत्रसर्वेक्षक (गट ब अराजपत्रीत) या पदावर नेमणुक करण्यात येते. क्षेत्रसर्वेक्षक या पदाची वेतनश्रेणी एस-14 (38600-122800) अशी आहे. त्या तुलनेत महसूल विभागातील भूकरमापक संवर्गातील कर्मचा-यांना परिरक्षण भूमापक एस-8 या वेतनश्रेणीतील संवर्गात पदोन्नती देण्यात येते.

नगर विकास विभागाच्या अधिपत्याखालील पिपंरी चिंचवड महानगरपालीकेतील सर्व्हेअर पदांबाबत सेवाप्रवेश नियम विहीत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर पदावर नियुक्तीकरीता मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी किंवा पदविका किंवा उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील 2 वर्षाचे सर्व्हेअर कोर्स उत्तीर्ण व एन.सी.टी.व्ही.टी. उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. आणि मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. सदर पदास सातव्या वेतन आयोगानुसार एस-8 (25500-81100) ही वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे.

# भूमि अभिलेख विभागास तांत्रिक वेतनश्रेणी मिळणेबाबत

- **सुधारीत वेतनश्रेणीमुळे आर्थिक भाराबाबतची माहिती.**

| अ.क्र. | पद | 7 व्या वेतन आयोगानुसार मंजूर वेतनस्तर | मंजूर पदांनुसार वेतनावरील खर्च रुपये कोटीमध्ये | प्रस्तावित वेतनस्तर | प्रस्तावित वेतनस्तरानुसार वेतनावरील खर्च रुपये कोटीमध्ये | वाढ रुपये कोटीमध्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | भूकरमापक (4299 पदे) | S-6 19900-63200 | 261.38 | S-8 25500-81100 | 335.32 | 73.94 |
| 2 | परिरक्षण भूमापक (1392 पदे) | S-8 25500-81100 | 108.58 | S-10 29200-92300 | 136.14 | 27.56 |
| 3 | शिरस्तेदार (806 पदे) | S-13 35400-112400 | 87.21 | S-14 38600-122800 | 95.27 | 8.06 |
| | | **एकूण** | 512.07 | | 629.39 | 117.32 |

# धन्यवाद